राज्यात पाणी टंचाई निवारणार्थ कार्यक्रमासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांकरीता रुपये ३५०.०० कोटी इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे वर्ग करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन (म. व पु.) विभाग
शासन निर्णय क्रमांक- एससीवाय-०६/२०१९/प्र.क्र. ४०/म-११
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- १९ जून, २०१९

वाचा :-

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१९/२२४५/प्र.क्र.५५/ब-१, दिनांक ०१/०४/२०१९.

प्रस्तावना :-

पाणीटंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मागणी केल्याप्रमाणे सन २०१९-२० या वित्तीय वर्षांसाठी ग्रामीण / नागरी भागात पाणी टंचाई निवारण कार्यक्रमासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांकरीता (ऑक्टोबर,२०१८ ते जून २०१९) या टंचाई कालावधीसाठी एकुण रक्कम रुपये ४५०.८९ कोटी इतक्या रकमेची मागणी केली असून त्यापैकी सन २०१९-२० या चालू आर्थिक वर्षात लेखाशीर्ष (२२४५ ००९३) अंतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीतून रुपये ३५०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पेयजल टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण / नागरी भागात पाणी टंचाई निवारण कार्यक्रमासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांवरील ऑक्टोबर,२०१८ ते जून २०१९ या कालावधीतील खर्चाची देयके अदा करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मागणी केलेल्या रकमेपैकी **रुपये ३५०.०० कोटी (अक्षरी रुपये तीनशे पन्नास कोटी फक्त)** इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षात मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य ०१, अवर्षण १०२, पिण्याचा पाण्याचा पुरवठा (९१), राज्य आपत्ती निधीच्या मानकांनुसार खर्च (९१)(०१), पिण्याचा पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ००९३) या उपशीर्षाखाली उपलब्ध निधीतून रुपये ३५०.०० कोटी इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्यात येत आहे. संबंधित विभागाने सदर खर्च वर नमूद केलेल्या बाबींवर अंतिमत: खर्ची टाकावा.

३. सदर निधी कोषागारातून आहरीत करुन बँक खात्यात काढून ठेवला जाणार नाही, याचीही दक्षता घेण्याच्या सूचना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने संबंधितांना दयाव्यात.

४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपरोक्तप्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या निधीचा विभागनिहाय / जिल्हानिहाय आणि उपाययोजनानिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच एकुण वितरीत निधीच्या ८०% रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतरच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने यापुढील निधी मागणीबाबत कार्यवाही करावी. या प्रमुख अटीवर निधीचे वितरण करण्यात येत आहे.

५. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने खातरजमा करावी व हा निधी पाणी टंचाई कालावधी व्यतिरिक्त अन्य कालावधीतील उपाययोजनांसाठी व इतर बाबींवर खर्च होणार नाही, याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दक्षता घ्यावी.

६. नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ उपलब्ध करण्यात आलेल्या तरतूदीतून मागील वर्षात घेण्यात आलेल्या विविध योजना/ पाणी पुरवठा विषयक कामे पुर्ण करण्यात आली असल्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने खात्री करावी.

७. पाणी जीवनावश्यक /अत्यावश्यक बाब असल्याने, त्या आडून गैरप्रकार होणार नाहीत, त्याय-त्याच योजना पुन्हा-पुन्हा दरवर्षी घेण्यात येत नाहीत व त्यावर अनावश्यक खर्च करण्यात येत नाही, याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दक्षता घ्यावी.

८. ज्या जिल्हयांना मागील आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या निधीपैकी ज्या टक्केवारीच्या प्रमाणात उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. त्या जिल्हंयाना तेवढया टक्केवारीप्रमाणे निधी वितरीत करण्यात यावा. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने कार्यवाही करावी.

९. वितरीत निधी स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) अथवा बँक खात्यात न ठेवता तो कंत्राटदारांना थेट Electronic Clearing Services द्वारे वितरीत केला जाईल, या अटींच्या अधिन निधी वितरीत करण्यात येत आहे. तरी त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने कार्यवाही करावी.

१०. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे त्याबाबतची जिल्हानिहाय भौतिक प्रगतीची माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने या विभागाकडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधी वाटपाचे लेखे, अभिलेखे/नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे दरमहा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे पत्रक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने एकत्रितरित्या मदत व पुनर्वसन प्रभागास न चुकता सादर करावीत. झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्ाता नियंत्रक अधिकाऱ्यांनी घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

११. सदर निधी जरी मदत व पुनर्वसन विभागाकडून अर्थसंकल्पीत करण्यात आला असला तरी त्याचे सनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे असल्यामुळे सदर निधीचे नियमातील तरतुदीनुसार कोटेकोरपणे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची राहील. तसेच यानुषंगाने विधीमंडळविषयक, महालेखापाल यांच्या लेखापरीक्षण / लोकलेखा समिती विषयक वा इतर कोणत्याही स्वरुपाचे कामकाज पुर्णत: पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने हाताळणे आवश्यक राहील. वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे लेखे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने स्वतंत्ररित्या ठेवावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१९१७३९४९४८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.06.19 17:37:26 +05'30'

(राजश्री राऊत)
वित्तीय सल्लागार व सह सचिव

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (महसूल/ मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. सचिव, (मदत व पुनर्वसन प्रभाग), मंत्रालय, मुंबई
७. मा. महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९. संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. वित्त विभाग,(अर्थसं.-३/ अर्थसं.-६/ व्यय-९/व्यय-३/अर्थोपाय कक्ष/वित्त आयोग कक्ष) मंत्रालय,मुंबई
११. कार्यासन अधिकारी (ब-१/म-७/म-३/पीएसी/पीएसी-१कार्यासने) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती (म-११).